REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)    UGC APPROVED JOURNAL NO. 48514    ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 6 | MARCH - 2019

# "आधुनिक युगातील भारतीय बँका : संधी व आव्हाने"

**प्रा. डॉ. आसावरी आर. दुर्गे**
व्यवसाय व्यवस्थापन विभाग प्रमुख, कला,
वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, महादुला, कोराडी, नागपूर.

## सारांश




ह्या संशोधनासाठी नागपूर जिल्ह्याची निवड केली असून नागपूर जिल्ह्यातील 25 ग्रामीण व 25 शहरी असे एकूण 50 बँक अधिकारी नमुना निवड पद्धतीने निवडल्या गेले. आधुनिक युगात भारतीय बँकांना उपलब्ध झालेल्या संधी व त्यामुळे निर्माण झालेली आव्हाने हे पाहण्यासाठी नमुन्यांची निवड केल्या गेली व त्या आधारे सामुग्रीचे पृथःकरण व विश्लेषण करण्यात आले.

आजच्या 21 व्या शतकातील भारतीय बँक व्यवसाय आणि त्याच्या सभोवतालची परिस्थिती आणि समस्या पाहता व्यापारी बँकांना 18 व्या आणि 19 व्या शतकात ज्या कठीण समस्यांना तोंड द्यावे लागले त्याची आठवण होते. इतिहासापासून धडा शिकणे महत्वाचे असते. त्यासाठी भारतीय बँक व्यवसायासमोर अनेक संधी व तेवढीच आव्हाने आहेत. तेंव्हा वेळीच त्यांचे आकलन होऊन जो जी आव्हाने स्विकारेल व संधीचा उपयोग करून घेईल तो यशाचा अत्युच्च शिखरावर विराजमान असेल हे सांगण्यास कोणत्याही भविष्यवेत्याची गरज नाही. मात्र जो याचा सामना करणार नाही त्याचा बँक व्यवसाय डबघाईस आल्याशिवाय राहणार नाही व 18 व्या आणि 19 व्या शतकातील पुर्नरावृत्ती होण्यास वेळ लागणार नाही.

स्वातंत्र्यप्राप्ती नंतर भारताने जलद आर्थिक विकास घडवून आणण्यासाठी नियोजनाचा स्विकार केला अर्थव्यवस्थेच्या सर्व क्षेत्रांचा समतोल पद्धतीने विकास घडवून आणणे व समाजवादी समाजरचनेच्या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी नियोजन यशस्वी करणाऱ्या नियोजनकारांचा पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून साकार केला जात आहे. 1951 ते 1990 पर्यंत भारताने 7 पंचवार्षिक योजना पूर्ण केल्या. या काळात शेती, उद्योग व सर्व क्षेत्राच्या विकासात भारतीय बँकांचे योगदान बहुमुल्य आहे हे कुणीही नाकारू शकणार नाही. मात्र या काळात बँक व्यवसाय प्रामुख्याने ठेवी स्विकारणे व कर्जवाटप करणे यावरच भर देणारा होता.

## बँक या संकल्पनेचा उदय –

प्राथमिक कार्याच्या स्वरूपात बँकांच्या कार्याची सुरूवात फार वर्षापुर्वीच झालेली आहे. खिस्तपूर्व 2000 वर्षापूर्वीच बॅबिलॉन मधे बँकांची सुरूवात झाली होती. प्राचिन काळी ग्रीस व रोम मध्येही पतपैसा देण्याची पद्धत प्रचलित होती. इजिप्तमध्येही असेच पतपैशाचे व्यवहार केले जात असत. पतपैसा व पतपत्रे यासंबंधीचे उल्लेख 'मनस्मृती' मध्येही आढळतात.

बँक हा शब्द बँको (Banco) बँकस (Bancus) या शब्दांवरून रूढ झाला असावा असे मानले जाते. हे सर्व शब्द एक विशिष्ट प्रकारचे बाक असे सुचित करतात. आर्थिक व्यवहारासाठी युरोपियन ज्यू सावकार अश्या

विशिष्ट बाकांचा वापर करीत असत. पैसे उधारीने देण्याचा व्यवहार बराच तेजीत असल्यामुळे हा शब्द प्रचारात आला. इंग्लंडमधील लोंबार्डीतील ज्यू लोक अश्याच प्रकारच्या बाकांचा वापर करत असल्याचे उल्लेख आढळतात. हेच सावकार लोकांची देणी देण्यात अयशस्वी झाले तर त्या बाकांची मोडतोड करून दिवाळे दाखविले जाई यावरून दिवाळखोर (Bankrupt) हा शब्द रूढ झाला असावा. काही अर्थतज्ञांच्या मते, इटालियन शब्द Monte (मॉंटे) वरून बँक हा शब्द आला असावा. Monte अथवा Mound म्हणजे ढीग आर्थिक व्यवहार तेजीचा व सुरळीत होण्यासाठी ढीगभर पैशाची गरज असे. म्हणजेच बँक हा शब्द बँको किंवा मॉंटे या शब्दावरून आला असावा.

### संशोधनाचा उद्देश –

आज उदारीकरण, खाजगीकरण आणि जागतिकीकरणाच्या युगात सर्व स्तरावर मोठी स्पर्धा असून सर्वांना आपली ओळख आणि अस्तित्वाची लढाई जिंकण्यासाठी बदल करणे आवश्यक झाले आहे. हे बदल बँकिंग व्यवसायात ग्राहकाला आकर्षित करून उत्तम सेवा आणि उत्पाद उपलब्ध करून देण्यापुरते सीमित नसून शिघ्र निर्णय प्रणाली, उत्तम कामगार संबंध, प्रशासनाची पकड आंतरिक यंत्र व्यवस्था व अद्ययावत तंत्रज्ञानाद्वारे बँकींग व्यवस्थेत सुधार घडविणे सुद्धा आवश्यक आहे. करिता "आधुनिक युगात भारतीय बँकांना मिळणाऱ्या : संधी व आव्हाने" हा विषय अभ्यासासाठी, सदर संशोधन हाती घेण्यात आले. या संशोधनामध्ये बँकिंग व्यवसाय, त्यांत झालेले अमुलाग्र बदल, व्यवसायाची प्रगती, विकास, सरकारचे आर्थिक धोरण, बँक व्यवसायातील नवसंकल्पना, त्याचा बँकिंग व्यवसायावर होणारा परिणाम याचा विचार प्रामुख्याने करण्यात आलेला आहे. त्याच बरोबर बँकिंग व्यवसायाला स्विकारावे लागणारे आव्हाने याचा सुद्धा विचार या संशोधनामध्ये करण्यात आला आहे.

### संशोधनाच्या मर्यादा –

प्रस्तूत संशोधन हे महाराष्ट्रातील, नागपूर जिल्ह्यातील व निवडक तालुक्यातील ग्रामीण व शहरी भागापुरतेच मर्यादित आहे. परंतू व्यावहारिक व नागपूर जिल्ह्यातील विविध व्यापारी बँकातील ज्या शाखा आहेत त्यांचीच निवड नमुना निवड पद्धतीने करून या बँकेतील अधिकाऱ्यांकडून प्रश्नावली भरण्यात आली.

### जनसंख्या व न्यादर्श निवड –

ह्या संशोधनासाठी नागपूर जिल्ह्याची निवड केली असून नागपूर जिल्ह्यातील 25 ग्रामीण व 25 शहरी असे एकूण 50 बँक अधिकारी नमुना निवड पद्धतीने निवडल्या गेले. आधुनिक युगात भारतीय बँकांना उपलब्ध झालेल्या संधी व त्यामुळे निर्माण झालेले आव्हाने हे पाहण्यासाठी नमुन्याची निवड केली व त्याआधारे सामुग्रीचे पृथःकरण व विश्लेषण केले.

### संशोधनाचे स्त्रोत –

प्राथमिक स्त्रोत च्या अंतर्गत प्रश्नावली तयार करून विषयाला अनुसरून विविध प्रश्नांद्वारे माहिती एकत्रीत केली. दुय्यम स्त्रोताच्या अंतर्गत विविध बँकांचे अहवाल, रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे अहवाल, माहिती पत्रके, डायरी, बँकासंबंधी वर्तमान पत्रातील लेख, बँकांच्या विविध कार्याचा आढावा घेणारी संक्षिप्त माहिती दर्शविणाऱ्या पत्रिका इत्यादिंच्या माध्यमातून माहिती एकत्रीत केली.

### प्रश्नावलीची रचना –

प्रस्तूत संशोधनासाठी आवश्यक असणारी माहिती एकत्रीत करण्यासाठी प्रश्नावली या प्रमुख साधनाचा प्रयोग करण्यात आला. पुनर्वर्ती संशोधनाचा आधार वाणिज्य क्षेत्राशी संबंधीत ग्रंथाचा व अनुभवी मान्यवर प्राध्यापकांशी सल्लामसलत करून प्रारंभिक प्रश्नावली तयार केली.


## सांख्यिकीकरण, विश्लेषण आणि प्रस्तुतीकरण –

प्रश्नावलीद्वारा प्राप्त झालेल्या प्रतिसाधकांच्या प्रतिसादाचे प्रतिशत प्रमाण काढण्यात आले व त्याचे उद्देशानुसार तालिकीकरण, विश्लेषण व पृथःकरण, आलेख यांच्या आधारे निष्कर्ष व उपाययोजना प्रस्तूत करण्यात आल्या व आधुनिक युगातील भारतीय बँका : संधी व आव्हाने मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

**तक्ता क्रमांक 1**
**आधुनिक भारतातील बँकांचा विकास कोणत्या कारणांमुळे शक्य झाला याचे प्रतिशत प्रमाण दर्शविणारा तक्ता**

| विवरण | ग्रामीण भाग | शहरी भाग | एकूण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| राष्ट्रीयीकरणामुळे | 25 | 21 | 46 | 92 |
| विलिनीकरण, एकत्रीकरण व खाजगीकरण | – | 01 | 01 | 02 |
| यांत्रिकीकरण | – | 03 | 03 | 06 |
| **एकूण** | **25** | **25** | **50** | **100%** |

वरील तक्त्यावरून असे निदर्शनास येते की 92% राष्ट्रीयीकरणामुळे विकास झाला. 2% विलिनीकरण, एकत्रीकरण व खाजगीकरणामुळे विकास झाला तर यांत्रिकीकरणामुळे 6% विकास झाला यावरून असा निष्कर्ष काढता येतो की, भारतातील बँक क्षेत्राचा विकास राष्ट्रीयीकरणामुळे झाला. ज्या क्षेत्रात बँकींग सेवा मिळत नव्हत्या त्या सेवा मिळू लागल्या. आर्थिक असंतूलन, क्षेत्रीय विषमता, सर्वसामान्यांना बँकींग सेवा उपलब्ध होण्याचे कारण राष्ट्रीयीकरण आहे असे म्हणतांना अतिशयोक्ती होणार नाही याचे श्रेय राष्ट्रीयीकरण होतांना सत्तेवर असलेल्या सरकारला देणे संयुक्तीक ठरेल.





**तक्ता क्रमांक 2**
**सरकारने जागतीकीकरणाचे धोरण स्विकारल्यामुळे बँकिंग क्षेत्रात स्पर्धा निर्माण झाली त्यामुळे बँकिंग व्यवसायाला तंत्रज्ञानाचा वापर याशिवाय पर्याय नाही याबाबतचा प्रतिशत दर्शविणारा तक्ता**

| प्रतिसाद | ग्रामीण | शहरी | एकूण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| वरील प्रश्नाला बरोबर प्रतिसाद देणारी प्रतिशत | 23 | 23 | 46 | 92 |
| चुक प्रतिसाद देणारे प्रतिशत | 02 | 02 | 04 | 08 |
| **एकूण** | **25** | **25** | **50** | **100%** |

वरील तक्त्यावरून असे निदर्शनास येते की, 92% तंत्रज्ञानाशिवाय पर्याय नाही असे मत आहे तर 08% तंत्रज्ञानाचा स्विकार करण्यास सहमत नाही. यावरून असा निष्कर्ष काढता येतो की, बँकींग व्यवसायात स्पर्धा

निर्माण झाली आहे. कमी वेळेत चांगली व तत्पर सेवा प्रदान करणे तंत्रज्ञानाशिवाय शक्य नाही. याला कारण अर्थव्यवस्थेला प्राप्त झालेले जागतीक स्वरूप होय व ग्राहकाला असलेला वेळेचा अभाव होय.





**तक्ता क्रमांक 3**

**संगणक कार्यप्रणाली मधे होणाऱ्या गैरव्यवहारांवर नियंत्रण ठेवण्यासाठी सायबर लॉ हा नवीन कायदा अस्तित्वात आला असल्यामुळे ईडीपी ऑडीट ही नवीन लेखा परिक्षण पद्धती बँकांना बंधनकारक झाली आहे त्याचा फायदा बँकींग व्यवसायाला झाला आहे किंवा नाही हे दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | प्रतिसाद | ग्रामीण | शहरी | एकूण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| 1 | वरील प्रश्नाला होय प्रतिसाद देणारे प्रतिशत | 24 | 25 | 49 | 98 |
| 2 | वरील प्रश्नाला नाही प्रतिसाद देणारे प्रतिशत | 01 | — | 01 | 02 |
| | **एकूण** | **25** | **25** | **50** | **100%** |

वरील तक्त्यानुसार असे निदर्शनास येते की, संगणक कार्य प्रणाली मधील होणाऱ्या गैरव्यवहारावर नियंत्रण ठेवण्यासाठी सायबर लॉ हा नवीन कायदा अस्तित्वात आल्यामुळे ईडीपी ऑडीट ही नवीन लेखा परिक्षण पद्धती बँकांना बंधनकारक झाल्यामुळे बँकींग व्यवसायाला त्याचा फायदा झाला असे 98% तर 2% फायदा झाला नाही असे मत दिले.

यावरून असा निष्कर्ष निघतो की सायबर लॉ या नवीन कायद्याची योग्य अंमलबजावणी केल्याने संगणक क्षेत्रातील गैरव्यवहार नियंत्रीत होवून लेखा परिक्षण सोपे जाईल व त्याचा फायदा बँकींग व्यवसायाला होईल.




## निष्कर्ष –

आधुनिक बँकांना नवीन आर्थिक धोरणानुसार आपल्या बँकींग व्यवसायात अमुलाग्र बदल घडवून आणण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. नवीन आर्थिक धोरणामुळे ग्राहकांच्या संख्येत वृद्धी, निर्यातीत वाढ,

उद्योगधंद्याचा विस्तार संतुलीत आर्थिक विकासात योगदान इ. नव्या संधी बँकींग व्यवसायाला प्राप्त झाल्या आहेत. नवीन नवीन संकल्पना या व्यवसायात येत आहेत. विपणन संकल्पना (Marketing) कालपर्यंत ही संकल्पना फक्त खाजगी व परदेशी बँकांपूरतीच होती. परंतू आज राष्ट्रीयकृत बँका सुद्धा यात अग्रेसर आहेत.

बँकींग व्यवसायात तत्पर ग्राहकसेवा, एटीएम (टच स्क्रीन) पिग्मीमशिन कोअर बँकींग, टेली बँकींग, चेकड्रॉप बॉक्स, मायक्रोफायनान्स, ॲट होम बँकींग, इंटरनेट बँकींग, एनीओव्हर बँकींग, क्रेडीट कार्ड, डेबीट कार्ड, स्मार्ट कार्ड, कामाच्या तासात वाढ, ग्राहक हिताय ग्राहक सुखाय धोरण इत्यादिंद्वारे विविध सुविधा ग्राहकांना देवून त्यांना तत्परसेवा देण्यासाठी नवीन–नवीन योजना निरंतर होत आहेत. त्यात नाविण्य राहून व्यवसायात वृद्धी साधण्यासाठी प्रभाविपणे अंमलबजावणी महत्वाची आहे.

## संदर्भ –


1) डॉ. आगलावे प्रदिप, *"सामाजिक संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे"*, श्री साईनाथ प्रकाशन 1, भगवाघर कॉम्प्लेक्स, धरमपेठ, नागपूर
2) डॉ. ढमढेरे एस.व्ही./प्रा. कुलकर्णी बी.डी., *"बँक व्यवसाय व सहकार"* डायमंड पब्लीकेशन, पूणे, 30 प्रथम आवृत्ती 25 जून 2009
3) Mehta Sailesh, *"Encyclopedia of Banking, Finance and Insurance"*, SBS Publishers and Distributors Pvt. Ltd., New Delhi 2009.
4) Uppal R.K., *"Changing Scenario of Indian Banking"*, Mahamaya Publishing House 12-H, Shantivan Marg, Opp. Traffic Kotwali, Darya Ganj, New Delhi - 2008.
5) इंडियन इंन्स्टिटयूट ऑफ बैंकिंग एंड फाईनैंन्स, *"वित्तिय प्रबंधन"* दि आर्केड, विश्व व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई – 2005
6) डॉ. जितेंद्र अहिरराव, डॉ. सुनिता वाजपेयी, डॉ. सुषमा चांदोरकर, *"पैसा व वित्त"* प्रथम आवृत्ती जुलै 2009


LBP PUBLICATION